ज्ञान प्रबोधिनी प्रशाला ५१

# 51@51

आम्ही ५१!





## गोष्ट क्र.२२

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेने काय दिले व काय दिले नाही असे मूल्यमापन मी करणार नाही. आई–वडिलांनी आपणास काय दिले/दिले नाही असे आपण विचारत नाही. ते त्यांच्या मर्यादेत आपल्यासाठी सर्वोत्तम प्रयत्न करत असतात. Prabodhini was an alternate home to many. अनेक शिक्षकांनी आम्हाला भरभरून दिले. It built a foundation for life with values. प्रबोधिनी सारखेच अनेक शिक्षक शांतपणे, कोणत्याही प्रसिद्धीच्या झोतात न येता शिकविण्याचे काम अनेक ठिकाणी करतात. कोरोना काळात अनेक शिक्षक छोट्या–छोट्या गावात जाऊन मुलांना शिकवत आहेत. माझ्या दृष्टीने ते खरे stars आहेत! मला अशी शांतपणे काम करणारी 'साधी' माणसे जास्त भावतात. आज आपल्या समाजात 'star syndrome' आहे. 'चमको नेतृत्वाची' चलती आहे - flamboyant leadership - मला त्याचे अजिबात अप्रूप नाही. प्रबोधिनीत आहे तशी non flamboyant leadership style ही जास्त आश्वासक वाटते.

मिलिंद साठे
(१९७१–१९७७)

## धमाल वर्षे आणि आयुष्यभराचे अनुभव

माझी पाचवी ते दहावी ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील वर्षे म्हणजे १९७१ ते १९७७. आपण शिक्षणाचे उद्दिष्ट मानतो, की मुळात ते मनुष्यघडण करणारे आणि आनंददायी असले पाहिजे. प्रबोधिनीमधील सर्वच दिवस आनंददायक व धमाल असे होते. आज मागे वळून पाहताना असे वाटते, की तो काळ प्रबोधिनीचा व प्रशालेच्या वाटचाली मधील सुरुवातीचा-घडणीचा काळ होता. Those were formative years of Jnana Prabodhini as an Institution. कुठलीही संस्था नवीन असते त्यावेळी त्याचे नेतृत्व आणि कार्यकर्ते मोठ्या उत्साही ताकदीने काम करत असतात. त्यावेळी निवडक मुले घेऊन त्यांना शिक्षण आणि प्रेरणा द्यायचा एक नवीन प्रयोग म्हणून प्रबोधिनी नुकतीच सुरू झाली होती. त्यामुळे आप्पांसह त्यावेळच्या सर्वच कार्यकर्त्यांनी आम्हा सर्वांना भरभरून दिले. त्यांच्या प्रेरणा, उत्साह, स्वप्ने जगण्याचा त्या सगळ्यांचा तो अतिशय intense असा कालखंड होता. साहजिकच we got to interact with the best of the people and the best of their energies. संस्था वाढते तशी ती हळूहळू स्थिरावते, प्रगल्भ होत जाते आणि कदाचित सुरुवातीच्या प्रेरणेची उत्कटता कमी होत जाते. माझे भाग्य की सुरुवातीच्या त्या उत्साहाने मुसमुसलेल्या वातावरणात आम्ही वाढलो.

सकाळी १० वाजता शाळेत आलो की रात्री ९-९.३० पर्यंत प्रशाला, दल, बैठका असे सुरू असायचे. अनेक वेगवेगळे अनुभव सांगता येतील पण काहीच नमूद करतो. काही आठवणी अशा असतात की ज्या आयुष्यभरासाठी लक्षात राहतात. मला आठवतं १९७१-७२ च्या महाराष्ट्रभर पडलेल्या दुष्काळात आम्ही काही विद्यार्थी २-३ दिवस गावांमध्ये श्रमदान शिबिरासाठी गेलो होतो. त्यावेळेस मनावर झालेले संस्कार अजूनही टिकून आहेत. असे अनुभवशिक्षण होणे हे प्रबोधिनीचे वैशिष्ट्य आम्हा विद्यार्थ्यांना आणि आमच्या पालकांनाही जाणवले.

## आप्पा

**आप्पा एक अचाट व्यक्तिमत्त्व होते. He cared for every element of institution. ते अगदी लहान मुलांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करून त्यांची मते जाणून घ्यायचे. पाचवी-सहावी मधील मुलाला बोलावून त्याला अहो-जाहो म्हणून त्याचे मत विचारायचे. त्यांच्याबद्दल अनेक लिखाण आणि बोलणे झालेले आहे. मी माझा वैयक्तिक अनुभव सांगतो. एक वेगळी आठवण आहे ती वार्षिक 'मनोगत' लेखनाची. एका वर्षी, बहुदा ७-८वी मध्ये असताना मी मनोगतात प्रबोधिनीतल्या कोणत्या तरी एका प्रसंगाबद्दल टीका केली होती. नंतर मी ते विसरूनही गेलो होतो. साधारण २-३ आठवड्यांनी मला आप्पांनी बोलावून घेतले. खाऊ दिला व मी जे काही लिहिले होते त्याबद्दल माझ्याशी चर्चा केली. आज हे सांगण्याचे कारण म्हणजे प्रबोधिनीच्या एकूण वातावरणात माझ्यासारखा एक लहान विद्यार्थी व त्याचे म्हणणे याकडे दुर्लक्ष केले असते तरी ते योग्य ठरले असते पण तसे झाले नाही. मी फार मोकळेपणाने आणि स्पष्ट शब्दात माझे मत लिहिले होते. He (Appa) took all the pains to explain to me the rationale behind that incident. आज आपण governance, democratic participation, inclusion, सर्वसमावेशकता असे मोठे शब्द वापरतो. आप्पांचे ते वागणे म्हणजे ही तत्त्वे जगण्याचे एक मूर्तीमंत प्रात्यक्षिक होते. त्यांच्या सर्वच नेतृत्वाचे एक विशेष म्हणजे त्यांची उत्कट स्वप्ने ते अनेकांपर्यंत पोचवू शकले, त्यात अनेक सहकार्यांना सहभागी करून घेऊ शकले. त्यांची स्वप्ने ही अनेकांची स्वप्ने झाली.**

## पालक-शिक्षक-संस्था : एकत्रित प्रवास

प्रशालेच्या त्या वर्षांत सकाळी १० ते रात्री ९.३० पर्यंत आम्ही प्रबोधिनीतच असायचो! पालकांच्या मनात कौतुक आणि काहीतरी भीतीही असायची, की आपला मुलगा नक्की करतो तरी काय? काही कुरबुरही असायची. मात्र पालकांना ही खात्री होती की प्रबोधिनीचे संस्थाचालक आणि कार्यकर्ते ह्या चांगल्या उद्दिष्टाने काम करणाऱ्या व्यक्ती आहेत त्यामुळे काही न पटणाऱ्या उपक्रमात देखील फार तक्रार न करता पालक विद्यार्थ्यांना पाठवत. प्रबोधिनी फक्त पाठ्यपुस्तकाची तयारी करून घेणारी शाळा नाही तर येथील उपक्रमांचे design हे काहीतरी वेगळे आहे, हे सर्वांना नक्कीच जाणवले. मूल्यांवर आधारित भक्कम पाया, सामाजिक जाणीव आणि योग्य नीतिमत्तेवर आधारलेली वागणूक या त्रिसूत्रीमधून विद्यार्थी घडतात. अनेक अनुभवांच्या शिक्षणाची त्याला जोड होती. It was not just an ordinary exposure but the sheer quality and diversity of exposures that made the difference. परंतु, आज मागे वळून पाहताना असे वाटते, की यामुळे विद्यार्थ्यांच्या घडणीमध्ये त्याच्या कुटुंबाचा सहभाग कमी असायचा. कुटुंबासोबत जो वेळ मिळायला हवा तो फार कमी मिळायचा. आम्हा मुलांना शाळेत थांबायला अधिक आवडायचे आणि अर्थात आम्ही त्यात आनंदी होतो. पण आज ४०-४५ वर्षांनी पुन्हा मागे वळून पाहताना आणि माझ्या गेल्या काही वर्षांतील लहान मुलांबरोबर केलेल्या कामाच्या अनुभवावरून मला वाटते की हे असे होणे

फारसे उपयुक्त नाही. It may not be the best thing to happen to a child. संस्थेसोबतच पालक, शिक्षक आणि कुटुंबातील इतर घटक या सर्वांच्या सहवासातून विद्यार्थिनी/विद्यार्थी घडतात. या सर्वांचा सुयोग्य सहभाग कसा असेल याचा एक fine balance ठेवावा लागेल.

### १०वी नंतरचे 'खुला आसमान' !

इयत्ता दहावी नंतर दोन वर्षे फर्ग्युसन महाविद्यालयात, एक वर्ष बी. जे. मेडिकल व त्यानंतर चार वर्षे दिल्लीला अभियांत्रिकीच्या अभ्यासाला मी गेलो. दिल्लीत मी वसतिगृहात रहायला होतो. तिथे जगातल्या सर्व गोष्टी स्वत:च्या हिंमतीवर करायला लागतात. त्यातून तुम्ही जगण्याच्या दृष्टीने तयार होता. शालेय जीवनात तुमच्या नैतिक आणि सामाजिक मूल्यांचा पाया भक्कम होतो. ज्ञान प्रबोधिनीतील शिक्षण कधीच एकांगी नव्हते. नीतिमान व्यक्ती घडवणारे शिक्षण प्रबोधिनीत मिळाले. प्रबोधिनीत असा भक्कम पाया मिळतो की ज्याला नंतर कधीही धक्का लागू शकत नाही. पण जगामध्ये वावरत असताना व्यवहार करायला जी कौशल्यं लागतात त्यातली काही कौशल्यं तुम्हाला नंतर अनुभवातून शिकायला लागतात. अशी कौशल्यं मला दिल्लीला वसतिगृहात शिकायला मिळाली. आज मी आवर्जून सांगतो, की प्रत्येकाने शिकत असताना काही वर्षे तरी वसतिगृहात रहायलाच पाहिजे! तेथे तुम्ही स्वत:च्या हिंमतीवर एकट्यानेच सर्व अनुभवांना सामोरे जायला शिकता. वसतिगृहात झालेली मैत्री आयुष्यभर टिकते. ज्ञान प्रबोधिनीचे विश्व छोटे होते. तिथे सर्वच व्यक्ती सज्जन-सुस्वभावी होत्या. प्रबोधिनी एक सुरक्षित घर होते. It was a small eco-system. मी सदाशिव पेठेत रहायचो. शाळा देखील जवळच असल्याने माझे त्यावेळचे विश्व सदाशिव पेठेपुरतेच मर्यादित होते. मग वेगवेगळ्या टप्प्यांवर त्याचा विस्तार होत गेला. महाविद्यालयात असताना दिल्ली ही त्या अर्थाने 'खऱ्या जगाची' ओळख देणारी ठरली. तिथे सर्वच स्वभावाच्या व्यक्ती भेटल्या. ते जग अधिक मोठे आणि गुंतागुंतीचे होते. प्रबोधिनीत शिकलेल्या गोष्टी या पायाभूत असतातच/होत्या. पण व्यापक जगात वावरताना लागणारी 'जीवनकौशल्ये' life skills मला स्वत:च दिल्लीच्या चार वर्षांच्या काळात वसतिगृहात राहून शिकायला लागली.

विद्युत अभियांत्रिकीचे शिक्षण, त्यानंतर MBA पदवी असे माझे शिक्षण झाल्यावर त्यावेळेस Vulcan Laval (आत्ताची Alfa Laval) येथे मी एक वर्षाचा प्रकल्प केला. तिथे पहिल्यांदा computer ची ओळख झाली आणि त्यात रस निर्माण झाला. त्यातूनच मी Link Software या स्वतःच्या व्यवसायाची सुरुवात केली. छोट्या व मध्यम उद्योगांसाठी ERP product व सेवा पुरविणे हे माझ्या व्यवसायाचे प्रमुख काम होते. २००० सालापर्यंत हा व्यवसाय मी वाढवला पण नंतर मला असे लक्षात आले, की व्यवसाय वाढवायचा म्हणजे मोठी गुंतवणूक, मोठ्या संख्येने कर्मचारी आणि तंत्रज्ञान असणे इत्यादी सर्व आले व माझा तो स्वभाव नाही. I have always looked at whatever I did - more as to what I would like to do, rather than as a planned business. मला लहान गटांबरोबर पण सखोल मानसिक गुंतवणूक करीत काम करणे जास्त आवडते. I prefer to work intensely with small teams of like minded people. त्यामुळे Link Software चा पसारा जास्त वाढवायचा नाही हे मी जाणीवपूर्वक ठरवले.

### Indiaart Gallery

Art is my passion. या आवडीतून मी त्याच सुमारास http://www.indiaart.com/ हे art portal सुरू केले. Indiaart Gallery च्या माध्यमातून अनेक कला प्रदर्शने देखील सादर केली. दहा वर्षांत सुमारे ५५०-६०० प्रदर्शने मुख्यत: पुण्या-मुंबईत आम्ही भरवली. प्रत्येक प्रदर्शन करण्यासाठी प्रचंड तयारी आणि नियोजन करायला लागते. या प्रदर्शनांच्या माध्यमातून तसेच online माध्यमाद्वारा जगभरातील हजारो कलारसिकांपर्यंत आणि art collectors पर्यंत आम्ही पोहोचू शकलो.



Khula Aasmaan Facebook Profile

२००७-०८ पासून Art Appreciation Workshop यासारखे उपक्रम चालवले. जवळपास ६-७ हजार जणांनी यात सहभाग घेतला. २०१६ मध्ये आम्ही 'खुला आसमान' (Khula Aasmaan-https://www.indiaart.com/khula-aasmaan/introduction.asp) या नावीन्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात केली. आपल्या बहुतांशी शिक्षण पद्धतीत मुलांना व्यक्त होण्याची - creative expression - संधी उपलब्ध होत नाही, हे खेदजनक पण वास्तव आहे. 'खुला आसमान' म्हणजे शब्दश: मुक्त-मोकळे आकाश. While designing the platform of 'Khula Aasmaan', we consciously selected art as the first medium of expression.



खुला आसमान प्रदर्शन बघताना



खुला आसमान
आर्ट वर्कशॉप



खुला आसमान प्रदर्शन बघताना

**खुला आसमानची सुरुवात करेपर्यंत माझं ठरलं होते की हे काम जागतिक नसले तरी किमान राष्ट्रीय स्तराचे करीन. 'खुला आसमान' ही स्पर्धा आता वर्षभरात चार वेळा नियमितपणे होते. आत्तापर्यंत त्यामध्ये भारतातील सुमारे १५०० ठिकाणाहून विद्यार्थी सहभागी झाले आहेत. त्यामध्ये सर्व भाषिक, आर्थिक आणि सामाजिक स्तरांतील मुले, खाजगी-सरकारी-जिल्हा परिषद शाळा सहभागी होतात. True diversity of India gets reflected in the kind of entries we get. ही संकल्पना अनेकांना आवडलेली आहे आणि त्याचे काम अनेकांना आकर्षित करत आहे. स्पर्धेत निवड (shortlist) झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यासाठी आम्ही एक स्वतंत्र webpage तयार करतो व पुढची तीन वर्षे त्यांच्या कामाला – चित्रांना तेथे प्रसिद्धी देतो. मला सांगायला आनंद वाटतो, की आजपर्यंत अशा १३०० हून अधिक विद्यार्थ्यांची web pages आम्ही प्रकाशित केली आहेत. We showcase their talent. They are the alumni of Khula Aasmaan.**
नुकतेच 'खुला आसमान Music' ही कल्पना घेऊनही पुढे जात आहोत.

या उपक्रमांची भूमिका स्पष्ट आहे. विद्यार्थ्यांना त्यांचे कलागुण व्यक्त करण्याची संधी उपलब्ध करून देणे व यातून व्यापक जनप्रबोधन- जाणीव-जागृती (sensitisation) होणे. पुढे जात असताना मुलांना त्यांच्या क्षमतेची आणि जगातील संधींची पूर्ण ओळख करून देणे मला महत्त्वाचे वाटते. आज एक पालक आणि शिक्षण क्षेत्रात काम करणारा म्हणून मला वाटते की पालक म्हणून मुलांना आपण छोटी स्वप्नं दाखवतो. मुलांची स्वप्नं मोठी असतात परंतु आपण त्यांना बांध घालतो. Children are dreamers, they dare to dream. आपण त्यांना सतत practical reality आणि मर्यादा लक्षात आणून देतो. मर्यादा असल्या तरी मोठी स्वप्नं पाहता येऊ शकतात ही जाणीव करून देणे हे 'खुला आसमान'चे महत्त्वाचे काम आहे, असं मला वाटतं.

मला स्वत:ला लहानपणापासून चित्रकला-फोटोग्राफी यात रस आहे. महाविद्यालयात असतानाही मी अनेक प्रदर्शने पहायला जायचो. Indiaart Gallery तर्फे सादर केलेल्या प्रदर्शनांत येणाऱ्या अनेक व्यक्तींबरोबरचा संवाद मला नेहमीच एक आनंददायक व शिकवणारा अनुभव वाटतो.



Khula Aasmaan - collage of shortlisted
students artwork



Khula Aasmaan - collage of shortlisted
young students artwork

**बुद्धिमत्ता म्हणजे अनेक सुप्त क्षमतांच्या प्रकटीकरणाची संधी**

अनेक शाळांमध्ये, गावांमध्ये पुरेशा सुविधा उपलब्ध नसतात. मात्र लहान मुले प्रचंड उत्साही आणि कल्पक असतात. 'खुला आसमान'च्या निमित्ताने मी अनेक शाळांमध्ये विद्यार्थी आणि शिक्षकांना भेटलो. या प्रत्येक संवादातून मला जाणवलं की प्रत्येकातच 'बुद्धिमत्तेचे' प्रचंड भांडार आहे. त्या सगळ्या क्षमतांचे मोजमाप करणे अशक्य आहे. बुद्धिमत्तेचे अनेक पैलू असतात आणि मला खात्री आहे की अजून अनेक पैलूंचं मूल्यमापन होणं बाकी आहे.

प्रत्येक मुलाचे काही पैलू विकसित असतात तर काही विकसनशील असतात. प्रत्येक संस्था त्यांना त्यांच्या गरजेनुसार ज्या प्रकारचे बुद्धिमत्तेचे पैलू लागतात, त्या प्रकारची चाचणी घेऊन विद्यार्थी किंवा उमेदवारांची निवड करतात. UPSC परीक्षेसाठी लागणारी बुद्धिमत्ता, IIT साठी लागणारी बुद्धिमत्ता आणि NDA च्या परीक्षेसाठी लागणारी बुद्धिमत्ता वेगळी आहे आणि त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या पूर्वपरीक्षा घेऊन मुलांची निवड होते. NDA मध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्याची UPSC मध्ये निवड होईलच असे नाही. त्यामुळे "Gifted' किंवा 'बुद्धिमंत' कोणाला म्हणायचे? सर्वगुणसंपन्न माणूस सापडणे अशक्यच आहे, असला तर तो 'रोबो'च असेल! आणि त्याच्याशी संवाद साधणे म्हणजे अगदी रटाळवाणा, uninteresting प्रकार होईल! बुद्धिमत्तेची चाचणी करताना आपण त्या व्यक्तीला शिक्का मारून बंदिस्त करू नये. The question is : Gifted in what? प्रत्येक विद्यार्थ्यातील क्षमतांची जाणीव व तो/ती जगात काय-काय करू शकतो या शक्यता, possibilities - opportunities याचे मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. असे कित्येक अनुभव मला मुलांबरोबर संवादातून मिळतात. कुमाऊं (Kumaon), उत्तराखंडमधल्या डोंगराळ भागात आम्ही भटकंतीला गेलो होतो. तिथे १५-२० घरांची एक वस्ती होती. आमच्याबरोबर ९-१० वर्षांचा एक स्थानिक मुलगा चालायला लागला. चालता-चालता मग मी त्याच्याशी गप्पा मारायला लागलो. त्याला काही वेळाने मी विचारले, आप क्या बनना चाहोगे? या प्रश्नाला उत्स्फूर्तपणे तो उत्तरला मुझे वैज्ञानिक बनना है! मी अवाक् झालो. पुण्या-मुंबईतील conditioned झालेली मुले-मुलीही असे उत्स्फूर्त प्रतिसाद देत नाहीत! IISER च्या एका माजी संचालकांना जेव्हा मी हा किस्सा सांगितला, तेव्हा ते म्हणाले - अशा मुलांना आपण थेट प्रवेश द्यायला पाहिजे!



what a way to school in Kumaon hills

आदिवासी भागातल्या शाळेत आम्ही घेतलेल्या एका कार्यशाळेत, ८वी मधील मुलीने उत्स्फूर्तपणे एका तासात एक चित्र काढले. तिचे आई-वडील निरक्षर. मी इतरांना आणि विशेषत: शिक्षकांना ते चित्र दाखवले. कोणी म्हणाले पूर आलेलं गाव दिसत आहे, कुणी म्हणाले भरती आलेली दिसत आहे. ती मुलगी नंतर मला एका प्रदर्शनात भेटली. तिला मी त्या चित्राबद्दल बोलायला सांगितले. तिचे बोलणे ऐकून मी थक्क झालो. जमिनीवर दिसणाऱ्या गोष्टी आकाशात व आकाशातील गोष्टी जमिनीवर दिसल्या तर कशा दिसतील हे दाखविण्याचा मी प्रयत्न केला! This was a fantastic concept, which even the most renowned painters would not conceive! अशाच दुसऱ्या गावात, एका मुलाने तुकाराम महाराजांचे चित्र काढले होते. त्याबद्दल त्याला बोलते करत होतो. शिक्षक सांगत होते - तो असा बोलणार नाही, तो लाजणारा मुलगा आहे. मी पुन्हा त्याला विचारले. तू आणखी काही सांगणार आहेस का? त्याने नंतरची चार मिनिटे तुकाराम महाराजांचा एक अभंग सुरेल चालीवर गायला! त्याला ती संधी परत मिळाली नसती तर तो अबोलच राहिला असता! पारंपरिक परीक्षा पद्धतीत मी त्याला चित्राबद्दल प्रश्न विचारले असते, कुठला कागद वापरला? कुठले रंग वापरले तर तो काही बोलला नसता आणि तिथे संवाद संपला असता. पण त्याला पुन्हा संधी मिळाली तेव्हा त्याने अभंगाच्या माध्यमातून व्यक्त व्हायचे ठरवले. आमच्या सुरुवातीच्या स्पर्धांमध्ये shortlist झालेली मुले-मुली आज विविध क्षेत्रांत चमकत आहेत. आमच्या सुरुवातीच्या स्पर्धेतील मुंबईची एक विद्यार्थिनी ISHC बोर्डात दुसरी आली. तिच्या प्रवासाची सुरुवात एका चित्रकला स्पर्धेत बक्षीस मिळण्यापासून झाली. आम्ही special children कडे विशेष लक्ष देतो. केरळ मधील एका dyslectic मुलीला Fashion Designer बनायचे होते. तिच्या वेबपेज मुळे तिचा portfolio तयार झाला. आज ती भुवनेश्वर NIFT मध्ये शिकत आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील.



**आशा देवाजी गरेल (इ. ८वी) हिने काढलेले चित्र**

## Self Discovery - स्व-शोध

पालक-शिक्षक या भूमिकेतून मला वारंवार प्रकर्षाने जाणवते, ती स्व-शोधाची प्रक्रिया, त्याचे महत्त्व व त्याला आपण चालना कशी देऊ शकू? खुला आसमानच्या माध्यमातून प्रत्येकाला व्यक्त होता येणे व आपल्या क्षमतांचा शोध घेता येणे ही आमची कल्पना आहे. आत्ताच्या पद्धतीत मुलांची घुसमट होते. सतत परीक्षेचा दबाव असतो. पालकांचा-संस्थेचा दबाव ताण देणारा असतो. आपल्या शिक्षण पद्धतीत 'कला' Arts या विषयाकडे एक गौण किंवा अत्यंत कमी महत्त्वाचा विषय म्हणून बघितले जाते. बहुतेक शाळांमध्ये फार-फार तर ७वी पर्यन्त चित्रकला किंवा art संबंधीचे विषय असतात. एकदा ७वी संपली की सर्वांचे लक्ष असते विज्ञान, गणित व भाषा या विषयांवर - व तीही इंग्रजी भाषा. इतर विषय जणूकाही बादच. विद्यार्थी आणि पालकांचाही focus १०-१२वीच्या गुणांकडे असतो. आत्ता-आत्ता जरा कुठे Liberal Arts शिक्षणाची सोय व त्याबद्दलचे पर्याय आपल्याकडे उपलब्ध होऊ लागले आहेत. नवीन शैक्षणिक धोरणात (NEP) सुद्धा याबद्दल विशेष आग्रहाने प्रतिपादन केले आहे.

**या दृष्टीकोनात बदल व्हावा म्हणून आम्ही अनेक कलाकार, creative personalities आणि विविध क्षेत्रांत विशेष काम केलेल्या व्यक्तींबरोबरचे व्हिडिओ (**https://www.indiaart.com/khula-aasmaan/conversations-talks.asp) **आणि audio (**https://www.indiaart.com/khula-aasmaan/audio.asp) **आमच्या पोर्टलवर प्रसिद्ध करत आहोत. कला या विषयात चांगले शिक्षक कमी आहेत. आम्ही अनेक artists सोबत video (**https://www.indiaart.com/videos/art-tutorials-painting-demonstrations.asp) **करतो आहोत, ज्यामुळे त्यांचे कौशल्य अनेकांपर्यंत पोचते.**

## Work Life Balance? It is all one! अद्वैत आहे!


आजकाल वर्क-लाईफ बॅलन्स बद्दल बरेच जण बोलत असतात. मला या दोन गोष्टी वेगळ्या आहेत असे नाही वाटत. Work and life, Personal and Professional असे काही द्वैत नाही. जोपर्यंत तुम्ही जे काही करत असता त्यात तुम्हाला आनंद मिळतो, तोपर्यंत तुम्ही ते मनापासून करता. मी कधी निवृत्त होईन असे मला वाटत नाही. मला ३-४ बक्षिसे, सन्मान मिळाले पण त्याच्याबद्दल मी काही बोलणार नाही. काही संस्थांना अशी बक्षिसे काही व्यक्तींना द्यायची असतात, मीही त्यात कधीतरी निवडलो गेलो इतकेच. मला त्याचे विशेष वाटत नाही. आपण जे काही करतो, त्यात पूर्णपणे involve होऊन आनंद मिळवणे मला जास्त महत्त्वाचे वाटते !



**रिया भट, श्री श्री रवि शंकर विद्यालय, मुंबई हिने काढलेले चित्र**



**मायरा अरोरा, धिरूभाई अंबानी इंटरनॅशनल स्कूल, मुंबई हिने काढलेले चित्र**



**ल्यूसी तिंबा, विवेकानंद केन्द्र विद्यालय, निरजुली, अरुणाचल प्रदेश हिने काढलेले चित्र**

**नेतृत्वासाठी काय आवश्यक आहे?**

मला सुदैवाने आजपर्यन्त वेगवेगळ्या प्रकारच्या व्यक्तींबरोबर काम करण्याची संधी मिळाली. अनेक क्षेत्रांतील मान्यवर व्यक्तींचा यात समावेश आहे – उद्योग, राजकारण, प्रशासन, शिक्षण, कला, विज्ञान इत्यादी. त्यातून मला वाटते की there is no formula for leadership. मला एक निश्चित जाणवले की नेतृत्वासाठी passion, energy तसेच compassion आवश्यक आहे. प्रबोधिनीने ethical leadership निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत. आज समाजात सर्वांचे ध्येय आहे की 'यश' मिळवायचे. यश मिळविताना साधन–साध्य यात गल्लत होऊ शकते. मूल्यांशी तडजोड होऊ नये म्हणून ethical leadership हवी. Participative leadership is a far better and secure option that protects interest of stakeholders. नेता म्हणजे जणू काही 'देव' आहे असे व्हायला नको. ते धोकादायक आहे. नेतृत्व प्रशिक्षणाचा नक्कीच उपयोग होतो पण प्रत्येकाने नेता बनण्याचा आग्रह धरू नये!

मला स्वत:च्या बाबतीत thought leadership महत्त्वाची वाटते. We need not follow established models of leadership. आपण एक नवीन कल्पना–विचार मांडला, त्या विचाराभोवती काही जण झपाटून जाऊन उभे राहिले तर ते नेतृत्वच आहे. अशा अनेक thought leaders ची आज आवश्यकता आहे.

**पुढील दिशा**

खुला आसमान चे काम वेगाने विस्तारते आहे. जितके नवीन विद्यार्थी या platform वर येतील तितके उत्तम. केवळ मोठे artist तयार करणे हा आमचा उद्देशच नाही. या माध्यमातून अनेक जण अभिव्यक्त होतील याच उद्देशाने आमचे काम चालू आहे. "To be able to express fearlessly' हे महत्त्वाचे! Our aim is to able to reach every child. सुरुवातीला ५ ते १५ वर्षे व १५ ते २५ वर्षे असे आमचे दोन वयोगट होते. अनेकदा विचारणा झाली की पाच वर्षांच्या आत का नाही? ज्येष्ठ नागरिक म्हणतात आमच्यासाठी का नाही? आता आम्ही खुला आसमान सर्वांसाठी उपलब्ध करत आहोत.


**विव्हिंग ड्रीमस्, स्नेहांका वालावलकर, मुंबई हिची कलाकुसर**

स्पर्धांबरोबर आम्ही इतरही अनेक प्रकल्प करत असतो. भारतात २४ मार्च २०२० ला लॉकडाऊन जाहीर झाला. २५ मार्चला सकाळी मी एक ब्लॉग लिहिला. 'Art in the time of Corona - fight negativity through positivity and creativity ' लोकांना भीती तर होतीच, पण घरात आहात तर घरात बसून काहीतरी create करा आणि आमच्याकडे पाठवा असे मी आवाहन केले. २१ दिवसांत आमच्याकडे भारताच्या कानाकोपऱ्यातून अनेक artworks आली. हा अफाट अनुभव होता की संकटाच्या काळात लोकांनी काय प्रकारे उत्स्फूर्तपणे प्रतिभा साकारली. जणू ५ ते १० हजार वर्षांपूर्वी आदिमानवानी तयार केलेल्या rock art सारखी! त्या काळी तर जेव्हा मानवाला निसर्ग, जंगली श्वापदे यांची भीती होती, तरीसुद्धा प्रतिकूल परिस्थितीत दगडांवर कला व्यक्त करायची उर्मी त्याच्याजवळ होती. आता तर आपण घरातच आहोत. मग काही वेगळी निर्मितीची प्रक्रिया का नाही करू शकणार? This is the power of art. ती उर्मी, ती ऊर्जा व्यक्त होण्याची गरज आहे. त्याला कोठेतरी सतत चालना द्यायला हवी.

**नव्या वाटा**

'Khula Aasmaan Music' मध्ये शालेय विद्यार्थी व कॉलेजमधील तरुणाईला music appreciation साठी दर्जेदार संगीत workshops चे आयोजन आम्ही करतो . **आम्ही सादर केलेल्या पहिल्या** music workshop **चे रेकॉर्डिंग indiaart वेबसाइटवर उपलब्ध आहे. यात धृपद संगीताचे सादरीकरण** (https://www.youtube.com/watch?v=OBvH67pTDuI ) **करण्यात आले आहे.**

या संकल्पनेद्वारे शाळांमध्ये आम्ही संगीत शिक्षणासाठी आणि त्यातून अभिव्यक्त होण्याची संधी उपलब्ध होण्यासाठी पूरक वातावरण निर्माण करण्याच्या प्रयत्नात आहोत. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी दोन प्रकारे आम्ही संधी उपलब्ध करून देत आहोत. एक म्हणजे मुलांसाठी वर्कशॉप्स आणि दुसरे म्हणजे शाळांमध्ये वाद्य उपलब्ध करून देणे आणि त्यासाठीचे infrastructure तयार करायला मदत करणे. Music is a powerful medium of expression. संगीताद्वारे अभिव्यक्त होण्याची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही हा प्रकल्प राबवत आहोत.

'अरमान' नावाचा एक दीर्घकालीन उपक्रम आम्ही हाती घेतलेला आहे. आपल्या समाजात ज्या व्यक्तींना काही विशेष गरजा आहेत आणि तरीसुद्धा खचून न जाता जे मोठ्ठ्या जिद्दीने अर्थपूर्ण आयुष्य जगत आहेत अशा व्यक्तींच्या प्रेरणादायी गोष्टी आम्ही या उपक्रमाच्या माध्यमातून सर्वांच्या समोर आणणार आहोत. आपला समाज अशा व्यक्तींसाठी तसा कमी संवेदनशील आहे. ती संवेदनशीलता वाढवणे याद्वारे आम्ही करू पाहत आहोत. आमचे या उपक्रमाचे मुख्य उद्दीष्ट म्हणजे त्यांच्या stories द्वारा आणि त्यांच्या कौशल्यानुसार त्यांच्यासाठी visibility निर्माण करणे आणि समाजातल्या सक्षम घटकांना आवाहन करणे हे आहे.

असाच एक मोठा ambitious आणि दीर्घकालीन प्रकल्प आम्ही हातात घेत आहोत तो म्हणजे Handcrafted in India.(https://india-art.blog/handcrafted-india-livelihood-employment/) यामध्ये आमची संकल्पना अशी आहे, की आम्ही Indiaart portal वर हस्तकलेशी निगडीत असलेल्या सामाजिक गट, बचत गट, छोटे उद्योग अशांचे काम प्रसिद्ध करणार आहोत. या गटांमुळे ग्रामीण आणि दुर्गम भागातील लोकांना आणि विशेषत: स्त्रियांना रोजगार उपलब्ध हो`त आहे. कदाचित असे गट हे हस्तकला, हातमाग, कापड विणकाम, अन्नपदार्थ निर्मिती, बांबूच्या वस्तू, पारंपरिक दागिने अशा अनेक प्रकारे कारागिरी करणारे लोक आहेत. ईशान्य भारत, झारखंड आणि भारतातील इतरही भागातील हे सर्व गट असतील. हे लोक सध्या कोविडच्या काळात मोठ्या आर्थिक अडचणीमध्ये आहेत. आम्हाला खरेदी-विक्रीमध्ये पडायचे नाही. आम्ही अशा गटांना त्यांची ओळख मिळवून देण्याचे काम करणार आहोत. त्यांचे काम आणि संपर्क देऊन लोक त्यांच्याशी संपर्क करू शकतील अशी संधी आम्ही देणार आहोत.

**भारतातील सर्वात मोठे आणि नावाजलेले कॅन्सर हॉस्पिटल - मुंबईतील टाटा मेमोरिअल सेंटरमध्ये भारतातील सर्व भागांतून लोक येतात. तिथे उपचारासाठी येणाऱ्या मुलांसाठी art workshop घ्यायला त्यांनी आम्हाला आमंत्रित केले. यातले अनुभव अद्वितीय होते. जी मुले केमोथेरेपीला सामोरे जात आहेत किंवा ज्यांना अगदी उभे राहण्याची देखील ताकद नाही अशा मुलांनी जेव्हा पाहिले, की आम्ही काही मुलांसोबत art workshop करत आहोत, त्यांनी कुठूनतरी ते बळ गोळा करून workshop मध्ये भाग घेतला आणि सगळेच जण आश्चर्यचकीत झाले. Art has immense potential. Art therapy चा देखील विचार आपण करायला हवा.**

पूर्णवेळ काम करणारी आमची टीम छोटी आहे. पण आम्हाला मदत करणारा हितचिंतकांचा गट खूप मोठा आहे. आमची संकल्पना आणि आत्तापर्यंत केलेले काम बघून आम्हाला मदत करणारे अनेक लोक आमच्याशी जोडले गेलेले आहेत. अनेकजण विविध प्रकारे आम्हाला मदत करत असतात. अनेकांनी आवर्जून सांगितलेले आहे की कुठलीही गरज लागली तर नक्की सांगा. आज जो विश्वास / goodwill आमच्या बरोबर आहे हे उभे करायला सुरुवातीपासून दीर्घकाळ आम्ही प्रयत्नपूर्वक काम केले आहे. Art promote करायला गेल्या वीस वर्षांत केलेले प्रयत्न आज नवीन संकल्पना राबवताना आमच्या कामी येत आहेत. मुळात मी टारगेट्स वगैरे समोर ठेऊन काम करत नाही. I strongly believe we should do whatever we do with great passion and derive joy and satisfaction from that!

### विद्यार्थी ते पालक

सुरुवातीला विद्यार्थी व नंतर पालक म्हणून माझा प्रबोधिनीशी प्रदीर्घ संबंध आला. विशेषत: येथील काही जणांशी वैयक्तिक connect आहे. आमचा मुलगा आलोक प्रशालेत शिकला. आमच्या वेळेस आम्ही ९.३०ला रात्री घरी जायचो. आलोकच्या वेळेस तो जरा एक-दीड तास लवकर घरी पोचायचा. सुरुवातीस आमचे शिक्षक कार्यकर्ते-शिक्षक होते, नंतरच्या वर्षात प्रशिक्षित शिक्षक प्रबोधिनीत आहेत. माझ्या दृष्टीने ही चांगली गोष्ट आहे. कारण त्या-त्या विषयांतील तज्ज्ञ domain experts हवेतच. अनेक वर्षे मी प्रशालेच्या website चेही काम केले. मिलिंद नाईक सर व अनेकांशी संपर्क असायचा. मिलिंद सर नवीन कल्पना व तंत्रज्ञानाचा वापर प्रशालेत कसा होईल हे जाणीवपूर्वक पाहतात हे स्तुत्य आहे. कारण १९७०-८०च्या काळात प्रबोधिनी हा शिक्षणातील वेगळा आणि नवीन प्रयोग होता. आता गेल्या २०-२५ वर्षांत प्रबोधिनीसारख्या अनेक शिक्षणसंस्था वेगवेगळे प्रयोग करत आहेत. तुम्हाला जर thought leadership टिकवायची असेल तर सतत नवीन प्रयोग करावे लागतील. ते इतके सोपे काम नाही. तसे न करता जुन्या पुण्याईवर व कर्तृत्वावर नुसते



**मुलगा आलोक बरोबर**

विसंबून राहता येणार नाही. सतत प्रयोगशील राहण्याचे प्रबोधिनी समोर मोठे आव्हान आहे. ते प्रबोधिनी सक्षमपणे पेलू शकते अशी माझी खात्री आहे.

ज्ञान प्रबोधिनी प्रशालेने काय दिले व काय दिले नाही असे मूल्यमापन मी करणार नाही. आई-वडिलांनी आपणास काय दिले/दिले नाही असे आपण विचारत नाही. ते त्यांच्या मर्यादेत आपल्यासाठी सर्वोत्तम प्रयत्न करत असतात. Prabodhini was an alternate home to many. अनेक शिक्षकांनी आम्हाला भरभरून दिले. It built a foundation for life with values. प्रबोधिनी सारखेच अनेक शिक्षक शांतपणे, कोणत्याही प्रसिद्धीच्या झोतात न येता शिकविण्याचे काम अनेक ठिकाणी करतात. कोरोना काळात अनेक शिक्षक छोट्या-छोट्या गावात जाऊन मुलांना शिकवत आहेत. माझ्या दृष्टीने ते खरे stars आहेत! मला अशी शांतपणे काम करणारी 'साधी' माणसे जास्त भावतात. आज आपल्या समाजात 'star syndrome' आहे. 'चमको नेतृत्वाची' चलती आहे - flamboyant leadership - मला त्याचे अजिबात अप्रूप नाही. प्रबोधिनीत आहे तशी non flamboyant leadership style ही जास्त आश्वासक वाटते.

मी समाजातल्या अनेक स्तरांतील लोकांना भेटतो. त्यात अनेक दिग्गज आणि पुरस्कार मिळालेले असतात. पण 'सर्वसामान्य' व न चमकणारी व्यक्तिमत्त्वे मला खूप शिकवून जातात. त्यांचीच छायाचित्रं मी काढतो, ना कोणा सेलेब्रिटीची! माझे जहांगीर आर्ट गॅलरीतले फोटोग्राफी प्रदर्शन बघायला एक प्रसिद्ध व्यक्ती आली होती. त्यांच्यासोबत माझ्या एका मित्राला फोटो काढायचा होता म्हणून त्याने मला त्यांना विचारायला सांगितले. मी त्या व्यक्तीचा आणि मित्राचा फोटो काढल्यावर त्यांनी मला विचारले की तुला माझ्यासोबत फोटो काढायचा आहे का? तर मी नाही म्हणालो. मला मोठ्या व्यक्तींपेक्षा सर्वसामान्य माणसे आणि छोट्या मुलांबरोबह फोटो काढायला अधिक आवडतात. लहान वयाच्या मुला-मुलींना मी भेटतो, कारण त्यांच्याशी संवाद साधून मला बरेच काही शिकायला मिळते. त्यांना काही संदेश देणे वगैरे भानगडीत मी पडत नाही! कारण मोठ्या व्यक्तींचे संदेश अगदी घासून-गुळगुळीत व अर्थहीन झाले आहेत. त्याऐवजी संवाद-देवाणघेवाण-कल्पनांबद्दल बोलणे, give and take on a common platform हे मला जास्त आवडते. त्यात मीही बरेच काही शिकतो. तरुण मुलांमुलींशी बोलताना तुम्हीही तरुण राहता. तुम्हाला नव-नवीन कल्पना समजून घेता येतात.

मी सर्व प्रकारचे फोटो काढतो. विशेषत: डोंगराळ भागात फोटोग्राफी करायला मला फार आवडते. इथे राहणारे लोक कष्ट करून जगतात आणि प्रेमळ असतात. ज्या ठिकाणी फारसे पर्यटक जात नाहीत अशा ठिकाणी मी मुद्दाम जातो. ऐतिहासिक ठिकाणे आणि वारसास्थळे यांचे देखील शूट करायला आवडते. मला रेल्वेचा प्रवास अतिशय आवडतो आणि रेल्वे हा विषय म्हणून शूट करायला पण आवडते. पर्वतातील अनेक रेल्वेंमधून मी प्रवास केलेला आहे. माझी सगळ्यात आवडती म्हणजे उटी पासून मेट्टूपलायम पर्यंत जाणारी निलगिरी माऊंटन रेल्वे. आजही ही गाडी निम्मा भाग वाफेच्या इंजिनावर चालते. त्या मार्गावर कुन्नूर ला steam loco वर्कशॉप आहे. तिथे जाऊन मी फोटोग्राफी केलेली आहे. दार्जिलिंग, हिमाचल प्रदेश मधील रेल्वे प्रवास देखील नयनरम्य आहे. मी रस्किन बॉन्डची बरीच पुस्तके वाचली आहेत आणि त्यांना भेटायची माझी इच्छा अजून पूर्ण व्हायची आहे. मी जी फोटोग्राफी करतो, त्यात zoom lens वापरण्यापेक्षा fixed focal length lens ने फोटो काढणे prefer करतो. योग्य चित्राची चौकट मिळविण्यासाठी (composition) तुम्हाला जरा जास्त कष्ट करायला लागतात. Keep walking for photography असं मी म्हणेन!




**Recognition to Khula Aasamaan at National Conference on Social Innovation**

## Rapid Fire

१. आवडता चित्रपट – Life is Beautiful , The Shawshank Redemption

२. आवडलेले पुस्तक – एक सांगणे अवघड आहे, The Invention of Hugo Cabret नावाच्या पुस्तकात एका रेल्वे स्टेशनवर राहणाऱ्या मुलाची कथा आहे. त्या पुस्तकात अप्रतिम चित्रं आहेत. या पुस्तकावर नंतर सिनेमा देखील आला.

३. आवडते आर्टिस्ट – Nicholas Roerich (रशियन चित्रकार – मनाली जवळ नग्गर येथे स्टुडिओ), Georgia O'Keeffe (प्रसिद्ध अमेरिकन महिला चित्रकार), परितोष सेन (कोलकता)

४. वर्गातील टोपण नाव – 'मिसा' (मिलिंद साठे) १९७६–७७ आणीबाणीच्या काळात Maintenance of Internal Security Act (MISA) मध्ये अनेकांना अटक झाली होती. त्यामुळे असाही संदर्भ त्याला होता.

**एका शब्दात वर्णन करा :**

- कला – Painting
- तंत्रज्ञान – Steam engine
- शिक्षण – खुला आसमान
- फोटोग्राफी – Keep walking to create your picture, do not just sit with a zoom lens.
- आप्पा पेंडसे – मनोगत लेखन – an overwhelming experience
- ज्ञान प्रबोधिनी – second family

५. पुन्हा आयुष्य जगायची संधी मिळाली तर काय व्हावेसे वाटेल?
– याच आयुष्यात अजून भरपूर काम करायचे आहे, पुढचे नंतर बघू!

**Milind Sathe**
Founder, Indiaart
Trustee, Art India Foundation
**Email : milind.sathe@gmail.com**
Blog : https://india-art.blog
Web : https://www.indiaart.com
**Mobile : +91-9890930547**

**मुलाखत व शब्दांकन – श्रेयश फापाळे, अथर्व पाटणे    संपादन – मानसी बोडस, पल्लवी गोखले – नगरकर**

**आरेखन व मांडणी – निशिगंधा खळदकर**

Write to us : jpp51_51@jnanaprabodhini.org